महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विदयापीठ मार्ग, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

दुरध्वनी क्र. ०२०-२५६७६८१८, २५५५१२०० Email:- principal.gppune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. शातंनिपु/पवि/२०२१/ ४८ दिनांक 20 FEB 2021

**विद्यार्थ्यांसाठी सूचना**

विषय – सम २०१९ सत्रामध्ये Class Declaration (CD) विषयांमध्ये विषय नोंदणी (Course registration) केलेल्या व या विषयांमध्ये श्रेणी वाढ (विषय निहाय गुणवत्ता वाढ) हवी असल्यास आवेदनपत्र सादर करणेबाबत

संदर्भ – महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुबई यांचे परिपत्रक जा. क्र. मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३ दिनांक १५ मे २०२०

कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्या अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे १८० गुणांक पूर्ण न होणाऱ्या, या संस्थेच्या सर्व नियमित विद्यार्थ्यांचा (सम २०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी केलेले विद्यार्थी), सम २०१९ सत्राचा निकाल जाहीर करतेवेळी फक्त लगतच्या अगोदरच्या एका सत्राचे ५०% गुणांच्या आधारावर व सम २०१९ सत्राच्या ५०% अंतर्गत गुणांच्या आधारावर गुण देऊन निकाल तयार करण्यात आला व अशा सरासरी गुणपद्धतीने संस्थेचा सम २०१९ सत्राच्या नियमित विषयांचा निकाल १० ऑगस्ट २०२० रोजी जाहीर करण्यात आला.

सदर निकाल जाहीर झाल्यानंतर उपरोक्त नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सम-२०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी केलेल्या Class Declaration (CD) विषयांमध्ये श्रेणीवाढ (विषय निहाय गुणवत्ता वाढ) हवी असल्यास त्यांची परीक्षा सम-२०२० सत्रात तत्कालीन मार्गदर्शक सूचनानुसार घेण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांना आवेदनपत्र सादर करावे लागेल.

श्रेणीवाढ (विषय निहाय गुणवत्ता वाढ) साठीचे आवेदनपत्र सादर करताना विद्यार्थ्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी -

१. श्रेणीवाढ (विषय निहाय गुणवत्ता वाढ) फक्त लेखी परीक्षेसाठी लागू राहील.
२. श्रेणीवाढसाठी (विषय निहाय गुणवत्ता वाढ) सम-२०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी केलेल्या सर्व Class Declaration (CD) विषयांची परीक्षा नोंदणी करावी लागेल.
३. सदर आवेदनपत्र विद्यार्थ्यांनी विभागप्रमुखांमार्फत सादर करावीत. आवेदन पत्र सादर करताना सम-२०१९ सत्राची मूळ गुणपत्रिका जमा करावी लागेल. श्रेणीवाढ न झाल्यास विद्यार्थ्यांना त्याच गुणपत्रिका परत देण्यात येतील.
४. आवेदनपत्र विहित कालावधीत सादर करावीत. याबाबतचे वेळापत्रक सम-२०२० सत्रामध्ये संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेनंतर सदर वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

विभागप्रमुख, यंत्र (द्वितीय पाळी)
तथा
परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग
शासकीय तंत्रनिकेतन
पुणे

प्रत -

१. मा. प्राचार्य यांना माहितीस्तव सविनय सादर
२. सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की त्यांनी यासंबंधी विद्यार्थ्यांना अवगत करावे.
३. संगणक विभागप्रमुखांमार्फत संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी